# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १४(२)] शनिवार, जून २७, २००९/आषाढ ६, शके १९३१ [ पृष्ठे ४, किंमत : रुपये १८.००

असाधारण क्रमांक ३२


**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.—** महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम ... .. .. .. .. | १-४ |


दिनांक २७ जून २००९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ह. बा. पटेल,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक २७ जून २००९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम).

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ**

**सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

(१९५६ चा मुंबई ४७. १९५६ चा मुंबई ४८. १९५६ चा मुंबई ४९. १९७७ चा महा. १. १९७८ चा महा. ८.)

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २००९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ जुलै २००९ पासून अंमलात येईल.

## प्रकरण दोन

## महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम ४अ मध्ये, " रुपये चार लाख" या मजकुराऐवजी, "रुपये सहा लाख" हा मजकूर दाखल करण्यात येईल. (१९५६ चा मुंबई ४७.)

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १२ब ची सुधारणा.

३. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १२ब मध्ये, " रु. ७,०००" या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १० क ची सुधारणा.

४. महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १०क मध्ये, " रु. ७,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. (१९५६ चा मुंबई ४८.)

९०७/५

प्रकरण चार

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा.**

१९५६ चा मुंबई ४९. **५.** महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम (या प्रकरणात, यात यापुढे, ज्याचा निर्देश "सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५च्या पोट-कलम (१अ) मध्ये, पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल.— सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

"**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्या सदस्याच्या निवासस्थानापासून त्याच्या सर्वात जवळ असलेले विमानतळ हे राज्याच्या बाहेर येत असेल अशा सदस्याच्या संबंधात, "त्याच्या निवासस्थानापासून सर्वात जवळ असलेल्या विमानतळावरून राज्यातील" या संज्ञेत, त्याच्या निवासस्थानापासून सर्वात जवळ असलेल्या राज्याबाहेरील विमानतळाचा अंतर्भाव असेल. ".

**६.** सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ६ मध्ये, पोट कलम (३) मधील, " रु. ७,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

प्रकरण पाच

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ याची सुधारणा.**

१९७७ चा महा. १. **७.** महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ (या प्रकरणात, यात यापुढे ज्याचा निर्देश " विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

(क) " रुपये दहा हजार " या मजकुराऐवजी, " रुपये पंधरा हजार" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पहिल्या परंतुकामध्ये,"रुपये सातशे पन्नास" या मजकुराऐवजी, " रुपये एक हजार" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**८.** विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियमाच्या कलम ४अ मध्ये,— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) " १ मे २००८ " या मजकुराऐवजी, " १ जुलै २००९ " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " पाच हजार रुपये " या मजकुराऐवजी, " सात हजार पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२अ) मधील,—

(एक) " १ मे २००८ " या मजकुराऐवजी, " १ जुलै २००९ " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " पाच हजार रुपये " या मजकुराऐवजी, " सात हजार पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (२ब) मधील, " १ मे २००८ पासून दरमहा पाच हजार रुपये " या मजकुराऐवजी, " १ जुलै २००९ पासून दरमहा सात हजार पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण सहा

## महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याची सुधारणा.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

**९.** महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याच्या कलम १०अ मध्ये, " रु. ७,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७८ चा महा. ८.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.